नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक

यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ थे Year - 4rd | अंक - १७९ Issue - 179 | वार - गुरुवार दि. २६ नोव्हेंबर २०२६ Blow- Thursday Date 26 NOVEMBER 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

दुष्काळग्रस्त ३३ जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना तीन महिने मोफत धान्य मिळणार

मंत्रिमंडळाचा निर्णय; खासगी अनुदानित शाळांच्या विनियमनासाठी सर्वसमावेशक कायद्याच्या प्रारूपालाही मंजुरी

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मुंबई : राज्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर मुंबई शहर, मुंबई उपनगर आणि ठाणे जिल्हा वगळता उर्वरित ३३ जिल्ह्यांतील राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेत समाविष्ट नसलेल्या शेतकऱ्यांना पुढील तीन महिने मोफत धान्य देण्याचा निर्णय बुधवारी मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. या निर्णयाचा राज्यातील ४२ लाख ३० हजार ७८३ शेतकऱ्यांना लाभ मिळणार आहे.

राज्यात सध्या राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेअंतर्गत पाच कोटी ७९ लाख ३४ हजार ७०२ लाभार्थ्यांना मोफत अन्नधान्य दिले जाते. तसेच आत्महत्याग्रस्त १४ जिल्ह्यांतील २१ लाख ६० हजार ६८२ शेतकऱ्यांना दरमहा १७० रुपये दिले जातात. मात्र, या दोन्ही योजनांचा लाभ मिळत नसलेल्या शेतकरी कुटुंबांनाही



दिलासा देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. त्यानुसार पात्र शेतकऱ्यांना दरमहा माणशी पाच किलो धान्य दिले जाणार आहे. यामध्ये तीन किलो तांदूळ आणि दोन किलो गव्हाचा समावेश असेल. पुढील तीन महिन्यांसाठी हे धान्य वितरित करण्यात येणार असून, त्यानंतर परिस्थितीचा आढावा घेऊन योजना पुढे सुरू ठेवण्याबाबत निर्णय घेतला जाईल.

राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियमांतर्गत धान्याचा लाभ किंवा एपीएल-डीबीटी योजनेअंतर्गत रोख लाभ न मिळणाऱ्या ३३ जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळेल. आधार सीडिंग पूर्ण झालेल्या शिधापत्रिकाधारकांना ई-पॉस यंत्राद्वारे बायोमेट्रिक पडताळणी करून धान्याचे वाटप करण्यात येईल. ज्या लाभार्थ्यांचे आधार सीडिंग अद्याप पूर्ण झालेले नाही, त्यांचे आधार सीडिंग पूर्ण झाल्यानंतरच बायोमेट्रिक पडताळणीद्वारे धान्य दिले जाणार आहे. या वितरणासाठी आवश्यक अतिरिक्त धान्याचे नियतन केंद्र सरकारच्या ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्रालयाकडे मागण्यासही मंत्रिमंडळाने मान्यता दिली.

दरम्यान, राज्यातील खासगी अनुदानित शाळांच्या विनियमनासाठी 'महाराष्ट्र खासगी अनुदानित शाळा (विनियमन) विधेयक, २०२६'च्या प्रारूपाला मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. खासगी अनुदानित शाळांच्या प्रशासनापासून शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवाशर्तींपर्यंत विविध बाबींचे नियमन करण्यासाठी सर्वसमावेशक कायदेशीर चौकट निर्माण करण्याच्या उद्देशाने हे विधेयक आणण्यात येत आहे.

राज्यातील एकूण शाळांपैकी खासगी अनुदानित शाळांचे प्रमाण २३ टक्के आहे. या शाळांमध्ये राज्यातील ४७ टक्के विद्यार्थी शिक्षण घेत असून, ३७ टक्के शिक्षक कार्यरत आहेत. या शाळांच्या नियमनासाठी सध्या लागू असलेल्या महाराष्ट्र खासगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन अधिनियम, १९७७, त्याअंतर्गतची १९८१ची नियमावली, माध्यमिक शाळा संहिता आणि बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, (पान ३ वर...)

पुणे कोर्ट गोळीबार प्रकरणात पाच आरोपींना अटक; क्राईम ब्रँचची कारवाई

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पुणे : शिवाजीनगर न्यायालयाच्या गेट नंबर ४ बाहेर भरदुपारी झालेल्या गोळीबार आणि कोयता हल्ल्याच्या घटनेनंतर पुणे पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत अवघ्या काही तासांत ५ आरोपींना ताब्यात घेतले आहे. या संपूर्ण हल्ल्याचा कट रचणाऱ्या अक्षय चव्हाण आणि अमोल चव्हाण या दोघांना पुण्यातून अटक करण्यात आली असून, थेट हल्ल्यात सहभागी असलेल्या आणखी ३ आरोपींना पुणे गुन्हे शाखेने दौंडमधून बेड्या ठोकल्या आहेत.

ज्यांनी या रक्तरंजित हल्ल्याचा संपूर्ण कट रचला होता, त्या अक्षय चव्हाण आणि अमोल चव्हाण यांना पुणे क्राईम ब्रँचने पुण्यातून ताब्यात घेतले आहे. तर दुसरीकडे, पळून जाण्याच्या प्रयत्नात असलेल्या ३ प्रत्यक्ष हल्लेखोरांना पुणे क्राईम ब्रँचने दौंड परिसरात सापळा रचून अटक केली आहे.



दोन सूत्रधार पुण्यातून तर तीन हल्लेखोर दौंडमध्ये गजाआड

शिवाजीनगर कोर्ट परिसरात फायरिंग आणि कोयत्याने वार केल्यानंतर आरोपींनी घटनास्थळावरून पळ काढला होता. हे आरोपी आधी दौंडच्या दिशेने आणि त्यानंतर सोलापूरच्या दिशेने निघाल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पुणे पोलिसांनी तत्काळ परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासून तांत्रिक तपास सुरू केला.

आरोपी ज्या मार्गाने पुढे गेले, त्या मार्गावरील सर्व पोलीस ठाण्यांना सतर्कतेचा इशारा देत माहिती पोहोचवण्यात आली. तसेच त्या मार्गावरील सर्व चेक पॉईंट्सवर पुणे पोलिसांची क्राईम ब्रँच तैनात करण्यात आली होती. नाकाबंदी आणि क्राईम ब्रँचच्या पथकाने केलेल्या कारवाईत ३ हल्लेखोर दौंडमधून ताब्यात घेण्यात आले असून, आता त्यांना पुढील सखोल चौकशीसाठी पुण्यात आणले जात आहे.

बुधवारी दुपारी सव्वाच्या सुमारास (पान ३ वर...)

पुण्यात भरधाव ट्रकची विद्यार्थ्यांना धडक; ३ जणांचा मृत्यू, दोघे गंभीर जखमी

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पुणे : पुणे जिल्ह्यातील येवलेवाडी परिसरात बुधवारी भीषण रस्ते अपघात घडला. ट्रिनिटी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्चच्या मुख्य प्रवेशद्वारासमोरील बस थांब्यावर उभ्या असलेल्या विद्यार्थ्यांना भरधाव ट्रकने धडक दिली. या दुर्घटनेत ३ विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला, तर अन्य २ विद्यार्थी गंभीर जखमी झाले. जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेमुळे महाविद्यालय परिसरात शोककळा पसरली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, डीजेचे अवजड साहित्य घेऊन जाणारा ट्रक बोपदेव घाटावरून येवलेवाडीच्या दिशेने खाली येत होता. ट्रिनिटी कॉलेजच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ पोहोचताच चालकाचे ट्रकवरील नियंत्रण सुटले. अनियंत्रित ट्रकने प्रथम एका कारला धडक दिली. त्यानंतर ट्रक रस्त्याच्या कडेला असलेल्या बस थांब्याकडे वळला. यावेळी बसची वाट पाहत असलेले विद्यार्थी ट्रकच्या धडकेत सापडले.

अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिक, महाविद्यालय प्रशासन आणि पोलीस घटनास्थळी दाखल झाले. या अपघातात ३ विद्यार्थ्यांचा जागीच मृत्यू झाला. गंभीर जखमी झालेल्या अन्य २ विद्यार्थ्यांना उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले



असून, त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगण्यात येत आहे.

येवलेवाडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मारुती पाटील यांनी अपघाताला दुजोरा दिला. पोलिसांनी अपघातात सहभागी ट्रक जप्त केला असून, चालक प्रतीक मारुती चव्हाण (वय २२, रा. माळशिरस, ता. पुरंदर) याला ताब्यात घेतले आहे. अपघातावेळी चालक मद्यधुंद होता का, हे तपासण्यासाठी त्याला वैद्यकीय तपासणीकरिता ससून रुग्णालयात पाठवण्यात आले आहे.

प्राथमिक माहितीनुसार, घाटाच्या उतारावर ट्रकवरील नियंत्रण सुटल्याने हा अपघात झाल्याचा अंदाज आहे. चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून, अपघाताचे नेमके कारण शोधण्यासाठी पोलीस पुढील तपास करत आहेत.

एसआयटीचे पथक मनोज जरांगे पाटलांच्या घरी दाखल, चौकशी केली जाणार

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

अंतरवली सराटी : ५०० कोटींच्या ऑडिओ क्लिप प्रकरणी एसआयटीचे पथक मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या घरी दाखल झाले आहे. मुंबई वरुन आलेले एसआयटीचे पथक मनोज जरांगे यांचा जबाब नोंदवणार आहे. मनोज जरांगे यांच्याकडे असलेल्या ऑडिओ क्लिपचा पेन ड्राइव्ह एसआयटी पथक ताब्यात घेणार असल्याची माहिती मिळत आहे. तसेच ऑडिओ क्लिप प्रकरणी जरांगे यांच्या आरोपांच्या अनुषंगाने एसआयटी कडून चौकशी केली जाणार आहे. एसआयटी पथक या क्लिपची फॉरेन्सिक इन्व्हिस्टिगेशन करणार



असल्याचीही माहिती मिळत आहे.

दरम्यान, मिळालेल्या माहितीनुसार, मनोज जरांगेंकडून ऑडिओ क्लिप एसआयटी ने ताब्यात घेतली आहे. पेन ड्राईव्ह सील कडून एसआयटीने मनोज जरांगे यांची सही घेतली आहे. मनोज जरांगे यांच्याकडून ऑडिओ क्लिप असलेला पेन ड्राइव्ह पोलिसांना सुपूर्द करण्यात आला आहे. एसआयटी पथकाने पेनड्राईव्ह सील करून पंचनामा केला आहे. तसेच मनोज जरांगे यांची सही घेतली आहे. मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटीत एसआयटीचं पथक दाखल झालं आहे. ५०० कोटींच्या ऑडिओ क्लिप प्रकरणी जरांगे पाटलांची चौकशी केली जाणार असल्याची माहिती मिळत आहे. काही दिवसांपूर्वी मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी एक पत्रकार परिषद घेतली होती. या पत्रकार परिषदेम ध्ये त्यांनी एक ऑडिओ क्लिप ऐकवली होती. या कथित ऑडिओ क्लिपमुळे चांगलीच खळबळ उडाली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मनोज जरांगे पाटील यांना देण्यासाठी भाजपकडून ५०० कोटी रुपये घेतले आणि ते श्रीकांत शिंदे यांच्या मार्फत दिले, असा उल्लेख या कथित ऑडिओ क्लिपमध्ये होता. या ऑडिओ क्लिपमुळे वातावरण चांगलंच तापलं. त्यानंतर थेट या प्रकरणाच्या चौकशीसाठी एसआटी नियुक्ती करण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. दरम्यान आता या प्रकरणात मोठी माहिती समोर येत आहे, ती म्हणजे या प्रकरणात नियुक्त करण्यात आलेलं एसआयटीचं पथक अंतरवाली सराटीमध्ये आल्याची माहिती समोर आली आहे. मनोज जरांगे पाटील यांची चैकशी करण्यात येणार असल्याची माहित मित आहे. तसेच ऑडिओ क्लिपचा पेन ड्राइव्ह एसआयटी पथक ताब्यात घेणार आहे.

मोदी मंत्रिमंडळाचे मोठे निर्णय! तब्बल १९,९३४ कोटींची तरतूद

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत देशातील पायाभूत सुविधा, यंत्रसामग्री उत्पादन आणि टपाल यंत्रणा अधिक सक्षम करण्यासाठी पाच महत्त्वपूर्ण प्रस्तावांना मान्यता देण्यात आली आहे. या सर्व प्रकल्पांसाठी केंद्र सरकार एकूण १९,९३४ कोटी रुपये खर्च करणार आहे. या निर्णयांमध्ये आसाममधील सिलचर येथे नवीन ग्रीनफील्ड विमानतळ उभारणे, तामिळनाडूतील काम राजार बंदराचा विस्तार करून तेथे दुसरे कंटेनर टर्मिनल बांधणे आणि बांधकाम क्षेत्रातील उपकरणांचे देशांतर्गत उत्पादन वाढवण्यासाठी ११,००० कोटी रुपयांची विशेष योजना राबवणे यांचा समावेश आहे. देशात बांधकाम आणि पायाभूत प्रकल्पांसाठी लागणाऱ्या मोठ्या यंत्रसामग्रीचे उत्पादन वाढवण्यासाठी मंत्रिमंडळाने ११,००० कोटी रुपयांच्या योजनेला मंजुरी दिली आहे.

तामिळनाडूतील कामराजार पोर्ट लिमिटेड येथे दुसरे कंटेनर टर्मिनल विकसित करण्याच्या प्रस्तावालाही मंजुरी मिळाली आहे. सुमारे ४,२८८ कोटी रुपये खर्चून हा प्रकल्प सार्वजनिक-खाजगी भागीदारी तत्त्वावर उभारला जाईल.

आसाममधील सिलचर येथील डोलू भागात नवीन ग्रीनफील्ड विमानतळ बांधण्यास मंत्रिमंडळाने हिरवा कंदील दाखवला आहे. (पान २ वर...)

१३ वर्षाचा चिमुकला बचावला, हादरवणारी घटना समोर

जळगावच्या एरंडोल येथील मजूर कुटुंबाच्या कारला अडवून सहा जणांनी केला हल्ला

कालव्याच्या वाहत्या पाण्यात सहा जणांना फेकलं, पाच जणांचा मृत्यू

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

जळगांव : बारडोली ट्रिपल मर्डर प्रकरणात मोठे यश आलं आहे. महाराष्ट्रातून एका आरोपीला अटक करण्यात आली आहे. बारडोली पोलिसांनी महाराष्ट्रातून सहआरोपी सदानंद बदाने याला ताब्यात घेतलं आहे. बारडोलीतील उवा गावाजवळ कालव्यात कुटुंबातील सहा जणांना फेकल्याच्या प्रकरणात कारवाई करण्यात आली आहे. जळगावच्या एरंडोल येथील मजूर कुटुंबाच्या कारला अडवून सहा जणांनी हल्ला केला होता. कुटुंबातील सहा सदस्यांना कालव्यात फेकले होते. यामध्ये पाच जणांचा मृत्यू झाला आहे, तर १३ वर्षीय मुलगा बचावला आहे. सुरत ग्रामीण पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत एका आरोपीला अटक केली आहे.

मुळचे जळगावचे रहिवासी असलेले नितीन पाटील, त्यांची पत्नी कविता पाटील, मुलगा प्रथमेश आणि हरीश तसंच आणखी एक लहान मुलगा आणि मुलगी असं सहा जणांच कुटुंब. मोलमजुरी करून पोट भरणारा हा परिवार. ओळखीच्याच लोकांनी त्यांना काम देण्याचं आमिष दाखवून गुजरातला बोलवून घेतलं. सूरतच्या दिशेनं निघाले असता उवा गावाजवळच्या कालव्याजवळ त्यांची गाडी थांबवण्यात आली. सर्वांना



मारहाण करून त्यांना कालव्याच्या वाहत्या पाण्यात फेकण्यात आलं. सहा पैकी पाच जणांचा मृत्यू झाला. तर एक १३ वर्षांचा मुलगा आश्चर्यकारकरित्या बचावला आणि त्यामुळे ही भीषण घटना जगासमोर आली.

दरम्यान, मंत्री गिरीश महाजन यांनी बारडोली झख पी.एन. जाडेजा यांच्याशी फोनवरून संपर्क साधला आहे. संपूर्ण घटनेची आणि तपासाच्या प्रगतीची मंत्र्यांनी माहिती घेतली आहे. विमा कंपनीशी संबंधित वादातून हत्या झाल्याचा पोलिसांना संशय आहे. मृत व्यक्ती विमा घोटाळ्यातील साक्षीदार असल्याची प्राथमिक माहिती देखील समोर आली आहे. बनावट विमा प्रकरणाचा भांडाफोड होण्याच्या भीतीतून साक्षीदारांना संपवण्याचा कट रचल्याचा संशय आहे. विमा वाद, वैयक्तिक वैमनस्य आणि अन्य कारणे अशा तीन प्रमुख शक्यतांवर पोलिसांचा तपास सुरु आहे.

गुजरातमधील बारडोली घटनेत नवा धक्कादायक खुलासा झाला आहे. मयत महिला व तिचे पती विमा कंपनी फसवणूक प्रकरणात संशयित आरोपी आहेत. दोघांवर मेहुनबारे पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पहिल्या पतीचा अपघाती मृत्यू दाखवून बोगस प्रस्ताव तयार केल्याचा संशय आहे. मयत महिला कविता पाटील आणि नितीन पाटील यांचा सहभागाबाबत तपास सुरु असतानाच ,समोर हत्याकांडाचा प्रकार समोर आला आहे. गुजरात आणि जळगाव पोलिसांकडून समन्वयाने पुढील तपास सुरु आहे. घटनेतील कारचालकाला जळगाव पोलिसांनी गुजरात पोलिसांच्या ताब्यात दिले आहे.

सुरत येथील बारडोली येथे झालेल्या घटनेत मयत झालेल्या महिलेवर मेहुनबारे पोलीस ठाण्यात लोंबार्ड आय एस आय या विमा कंपनीची फसवणूक केल्याप्रकरणी मेहुणबारे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जळगाव शहरातील खंडेराव नगर परिसरात राहणाऱ्या नितीन पाटील कुटुंबातील पाच जणांचे मृतदेह गुजरात राज्यातील सुरत जिल्ह्याच्या बारडोली तालुक्यातील एका नाल्यात हत्या करुन फेकून देण्यात आल्याचे समोर आले. सविस्तर माहिती अशी की, कामाच्या (पान ३ वर...)

संपादकीय....

महाराष्ट्र हादरला

पुण्यात गोळीबाराची घटना ताजी असतानाच आज मुंबईतील माहीम परिसरात देखील गोळीबार झाल्याची घटना घडली आहे. पी सी जैन ज्वेलर्स नावाच्या सोन्याच्या दुकानावर गोळीबार झाला आहे. या घटनेमुळं खळबळ उडाली आहे. दरम्यान, मिळालेल्या माहितीनुसार, या घटनेत सुदैवाने कोणीही जखमी नाही. या घटनेनंतर माहीम पोलीस पोलीस घटनास्थळी दाखल झाले आहेत. पुण्यात देखील गोळीबाराची घटना घडली होती. यामध्ये एक व्यक्ती गंभीर जखमी झाला आहे. त्यानंतर संध्याकाली मुंबईतील माहिम परिसरातील सोन्याच्या दुकानात गोळीबार झाल्याची घटना घडल्यानं खळबळ उडाली आहे. ही गोळीबाराची घटना नेमकी का घडली? यामागचा उद्देश काय होता? याबाबातची माहिती अद्याप मिळालेली नाही. दरम्यान, या प्रकरणाचा तपास तातडीने पोलिसांनी सुरु केल्याची माहिती मिळत आहे. दरम्यान, बुधवारी दुपारीच पुण्यातील शिवाजीनगर न्यायालयाच्या गेट नंबर ४ जवळ गोळीबाराची धक्कादायक घटना घडली होती. त्यानंतर लगेच मुंबईत देखील रात्री गोळीबाराची घटना घडली आहे. या दोन घटनांमुळं महाराष्ट्र हादरला आहे. पुण्यातील कात्रज भागातील रहिवासी असलेला मंदार किवळे (चरपवरी घळुरश्रश) हा कोर्टातील सुनावणी आटोपून गेट नंबर ४ बाहेर आला असता, दोन दुचाकीवरून आलेल्या ६ हल्लेखोरांनी त्याला घेरले. हल्लेखोरांनी आधी त्याच्यावर पिस्तुलातून गोळीबार करण्याचा प्रयत्न केला आणि त्यानंतर हातातील कोयत्यांनी त्याच्यावर सपासप जीवघेणे वार केले. भर गर्दीत झालेल्या या हल्ल्यामुळे न्यायालय परिसरात मोठा गोंधळ आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले. या हल्ल्यात मंदार किवळे गंभीर जखमी झाला असून, त्याला तातडीने उपचारासाठी ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. एकंदरीत दिवसेंदिवस राज्यात ठिकठिकाणी अशा घटना पहावयास मिळत आहे. कायदा व सुव्यवस्थेचा बोजवारा उडाला आहे, यावर योग्य त्या उपाययोजना करणे गरजेचे आहे.

मोदी मंत्रिमंडळाचे मोठे निर्णय! तब्बल १९,९३४ कोटींची तरतूद

(पान १ वरून...) २,०१४ कोटी रुपयांच्या या प्रकल्पाचा संपूर्ण खर्च भारतीय विमानतळ प्राधिकरण स्वतःच्या निधीतून करणार आहे.

पुढील पाच वर्षांत देशातील टपाल कार्यालये अधिक आधुनिक करण्यासाठी सरकारने १,१४१ कोटी रुपये मंजूर केले आहेत. टपाल विभागाची 'इस्टेट मॅनेजमेंट स्कीम' पुढे सुरू ठेवण्यास मंत्रिमंडळाने संमती दिली आहे. २०२६-२७ ते २०३०-३१ या पाच वर्षांत यावर १,४९१ कोटी रुपये खर्च केले जातील.

केंद्र सरकारच्या या १९,९३४ कोटी रुपयांच्या गुंतवणुकीत सर्वाधिक निधी देशांतर्गत बांधकाम उपकरण निर्मितीसाठी ठेवण्यात आला आहे. विमानतळ, बंदर विस्तार आणि टपाल सेवांच्या सक्षमीकरणातून देशाची वाहतूक व्यवस्था, व्यापार आणि नागरिकांना मिळणाऱ्या सेवा अधिक भक्कम करण्याचे पाऊल सरकारने उचलले आहे.

भारतीय संविधान वाचाल, तर वाचाल!



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

भारतीय संविधान म्हणजे केवळ कायद्यांचा संग्रह नाही, तर देशातील प्रत्येक नागरिकाला न्याय, स्वातंत्र्य, समानता आणि बंधुतेचा अधिकार देणारा लोकशाहीचा भक्कम आधारस्तंभ आहे. या महान संविधानाच्या निर्मितीत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान अतुलनीय आहे. प्रचंड अभ्यास, बुद्धिमत्ता, दूरदृष्टी आणि अथक परिश्रमांच्या बळावर त्यांनी संविधान निर्मितीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. ९ डिसेंबर १९४६ रोजी संविधान सभेची पहिली बैठक झाली. २९ ऑगस्ट १९४७ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली मसुदा समिती स्थापन करण्यात आली. विविध देशांच्या राज्यघटनांचा अभ्यास आणि भारतातील सामाजिक परिस्थितीचा विचार करून संविधानाचा मसुदा तयार करण्यात आला. २०१५ मध्ये केंद्र सरकारने २६ नोव्हेंबर हा दिवस दरवर्षी 'संविधान दिन' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला. भारतीय संविधान हा देशाचा आत्मा आहे. त्याचा सन्मान करणे, त्यातील मूल्यांचा प्रचार आणि प्रसार करणे ही प्रत्येक भारतीयाची सामाजिक जबाबदारी आहे.

भारतीय संविधानाची निर्मिती: ९ डिसेंबर १९४६ रोजी संविधान सभेची पहिली बैठक झाली. संविधानाचा मसुदा तयार करण्यासाठी २९ ऑगस्ट १९४७ रोजी सात सदस्यीय मसुदा समिती स्थापन झाली. या समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते. समितीमध्ये एन. गोपालस्वामी अय्यंगार, अल्लादी कृष्णस्वामी अय्यर, के. एम. मुन्शी, सय्यद मोहम्मद सादुल्ला, बी. एल. मित्तल आणि डी. पी. खेतान यांचा समावेश होता. पुढे बी. एल. मित्तल यांच्या जागी एन. माधवराव, तर डी. पी. खेतान यांच्या निधनानंतर टी. टी. कृष्णमाचारी यांची नियुक्ती झाली. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान स्वीकारण्यात आले आणि २६ जानेवारी १९५० रोजी ते अंमलात आले. संविधान सभेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना संविधान निर्मितीच्या या ऐतिहासिक प्रक्रियेला २ वर्षे, ११ महिने आणि १८ दिवस लागले. या प्रक्रियेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

संविधानाने दिलेले अधिकार: भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला सन्मानाने आणि स्वाभिमानाने जगण्याचा अधिकार दिला आहे. संविधानातील मूलभूत अधिकारांमुळे कायद्यासमोर समानता, भेदभावापासून संरक्षण, विचार व अभिव्यक्ती स्वातंत्र्य, देशभर मुक्तपणे फिरण्याचे आणि राहण्याचे स्वातंत्र्य तसेच व्यवसाय करण्याचा अधिकार मिळतो. अन्याय झाल्यास न्यायालयात दाद मागण्याचाही अधिकार आहे. त्यामुळे संविधान सामान्य माणसाच्या स्वाभिमानी जीवनाचा आधार आहे.

अन्यायाविरुद्ध लढण्याचे बळ: भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला अन्याय, अत्याचार आणि शोषणाविरुद्ध आवाज उठवण्याचे घटनात्मक बळ दिले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समाजाला अन्यायाविरुद्ध संघर्ष करण्याची प्रेरणा दिली. अन्याय सहन न करता त्याविरुद्ध कायदेशीर मार्गाने लढले पाहिजे. आपल्या अधिकारांची जाणीव असेल, तर कोणत्याही अन्यायाविरुद्ध निर्भयपणे उभे राहता येते.

सामाजिक समानता: भारतीय संविधानाने सामाजिक समानतेचा पाया मजबूत केला आहे. जात, धर्म, लिंग किंवा आर्थिक परिस्थितीच्या आधारावर भेदभाव न करता प्रत्येकाला समानतेची संधी मिळाली पाहिजे, हे संविधानाचे महत्त्वपूर्ण तत्त्व आहे. सर्व नागरिकांनी एकोप्याने आणि बंधुभावाने राहावे, हीच संविधानाची अपेक्षा आहे.

शिक्षणाचे महत्त्व: शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे. संविधानातील अनुच्छेद २१-अ नुसार ६ ते १४ वयोगटातील प्रत्येक बालकाला मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार देण्यात आला आहे. शिक्षणामुळे व्यक्तीला स्वतःचे अधिकार, कर्तव्ये आणि सामाजिक जबाबदाऱ्या समजतात. त्यामुळे शिक्षण हे केवळ ज्ञानाचे साधन नसून समानता, स्वाभिमान आणि प्रगतीचा मार्ग आहे.

महिलांचे अधिकार: भारतीय संविधानाने महिलांना समानतेचा, सन्मानाने जगण्याचा आणि कायद्याचे संरक्षण मिळण्याचा अधिकार दिला आहे. अनुच्छेद १४ नुसार कायद्यासमोर सर्व समान आहेत. अनुच्छेद १५ नुसार लिंगाच्या आधारावर भेदभाव करण्यास मनाई आहे, तर अनुच्छेद १५(३) महिलांसाठी विशेष तरतुदी करण्याचा अधिकार शासनाला देते. अनुच्छेद १६ नुसार सरकारी नोकरीत समान संधीची तरतूद आहे. तसेच कलम ३९(ड) मध्ये समान कामासाठी समान वेतनाचे तत्त्व, तर अनुच्छेद ४२ मध्ये प्रसूतीविषयक मदत आणि मानवी कामाच्या परिस्थितीची तरतूद आहे. महिलांच्या संरक्षणासाठी घरगुती हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा २००५, हुंडा प्रतिबंधक कायदा १९६१, कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ प्रतिबंधक कायदा २०१३, बालविवाह प्रतिबंधक कायदा २००६ आणि मातृत्व लाभ कायदा १९६१ असे विविध कायदे आहेत. प्रत्येक महिलेने आपल्या अधिकारांची माहिती करून घेऊन अन्याय, अत्याचार आणि शोषणाविरुद्ध आवाज उठवला पाहिजे. महिला सक्षम आणि सुरक्षित झाल्याशिवाय समानतेवर आधारित समाज निर्माण होऊ शकत नाही.

संविधानातील मूलभूत कर्तव्ये: भारतीय संविधानाने अधिकारांसोबत नागरिकांना काही मूलभूत कर्तव्यांची जबाबदारीही दिली आहे. अनुच्छेद ५१-अ मध्ये ११ मूलभूत कर्तव्यांचा उल्लेख आहे. यामध्ये संविधान, राष्ट्रध्वज आणि राष्ट्रगीताचा सन्मान करणे, देशाची एकता व अखंडता जपणे, देशाचे संरक्षण करणे, बंधुभाव वाढवणे, महिलांचा सन्मान राखणे, पर्यावरणाचे संरक्षण करणे, वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे, सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण करणे आणि पाल्यांना ६ ते १४ वयोगटात शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे यांचा समावेश आहे. तसेच स्वातंत्र्यलढ्यातील आदर्शांचे पालन, सांस्कृतिक वारशाचे जतन, प्राणिमात्रांबद्दल करुणा आणि उत्कृष्टतेसाठी प्रयत्न करणे हीदेखील मूलभूत कर्तव्ये आहेत. अधिकारांचा उपभोग घेताना कर्तव्यांचे पालन करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. अधिकार आणि कर्तव्यांचा समतोल राखल्यास लोकशाही अधिक मजबूत होईल.

आजच्या काळातील संविधानाची गरज : आजच्या काळात अन्याय, भ्रष्टाचार, जातीय भेदभाव, सामाजिक विषमता, महिलांवरील अत्याचार आणि नागरिकांच्या अधिकारांचे उल्लंघन अशा समस्या दिसून येतात. अशा परिस्थितीत संविधान प्रत्येक नागरिकाला न्याय, स्वातंत्र्य, समानता आणि बंधुतेचा मार्ग दाखवते. अनेक नागरिकांना आपल्या घटनात्मक अधिकारांची आणि कायदेशीर तरतुदींची पुरेशी माहिती नसल्यामुळे अन्यायाविरुद्ध आवाज उठवला जात नाही. त्यामुळे संविधानाची माहिती प्रत्येक घरापर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. शासन आणि प्रशासनाला जाब विचारणे, भ्रष्टाचाराविरुद्ध लढणे आणि लोकशाही मूल्यांचे संरक्षण करणे यासाठी संविधानाचे ज्ञान महत्त्वाचे आहे. संविधान हे केवळ सरकारी कार्यालये किंवा न्यायालयांपुरते मर्यादित नसून सामान्य माणसाच्या स्वाभिमानी जीवनाचा आधार आहे.

संविधान दिन : केवळ उत्सव नव्हे, तर संकल्पाचा दिवस: २६ नोव्हेंबर हा दिवस भारतीय संविधान दिन म्हणून साजरा केला जातो. हा दिवस संविधान स्वीकारल्याच्या ऐतिहासिक घटनेची आठवण करून देण्याबरोबरच न्याय, स्वातंत्र्य, समानता आणि बंधुता ही मूल्ये जपण्याचा संकल्प करण्याची प्रेरणा देतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून प्रत्येक व्यक्तीला समान हक्क, स्वातंत्र्य आणि न्याय मिळावा यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले. संविधानाचे महत्त्व केवळ संविधान दिनापुरते मर्यादित न ठेवता ते दैनंदिन जीवनात आचरणात आणणे गरजेचे आहे. कलम १४ समानतेचा अधिकार देते, कलम १९ विविध स्वातंत्र्ये प्रदान करते, तर कलम २१ जीवन आणि व्यक्तिगत स्वातंत्र्याचे संरक्षण करते.

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अथक परिश्रमातून साकारलेल्या संविधानाचा सन्मान करणे आणि त्यातील समता, स्वातंत्र्य, न्याय व बंधुता ही मूल्ये आचरणात आणणे, हीच संविधान दिनानिमित्त त्यांना खरी आदरांजली ठरेल!

मी प्रथम भारतीय, अंतिमतः भारतीय!

लेखक : मिलिंद सुरेश जाधव
मो.८६५५५६९४३६

शरणकुमार लिंबाळे : जातीभेदाचे आणि शोषणाचे टोकदार दुःख सोसलेल्या संयमी लेखकाची निवड



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

१९८४ मध्ये प्रकाशित झालेल्या 'अक्करमाशी'मधून शरणकुमार लिंबाळेंनी आपली भळभळती जखम शब्दबद्ध केली. आमच्या सोलापूर जिल्ह्यातील हुन्नूर गावचा त्यांचा जन्म. मराठी कानडी बहुभाषिक असणारा हा परिसर. त्यांचा जन्म महार जातीतल्या आईच्या पोटी, मसामाईच्या पोटी झालेला आणि जातीचा हा बाभूळकाटा दुहेरी होता! सवर्ण समाजातील लिंगायत जातीचे हणमंत लिंबाळे हे त्यांचे जन्मदाते. मसामाई आणि हणमंत यांच्या संबंधातुन त्यांचा जन्म. वडील जमीनदार आणि आई भूमिहीन, उपेक्षित! दोन्ही बाजूंच्या समाजाने या संबंधाला अनैतिक ठरवले आणि शरणकुमारला 'अक्करमाशी' म्हणून हिणवले.

'अक्करमाशी' ही शरणकुमार लिंबाळे यांची आत्मकथा. 'अक्करमाशी' म्हणजे अनौरस संतती; ज्याला वडिलांचे नाव धारण करण्याचा अधिकार लाभला नाही, ज्याला समाज मान्य करत नाही. आजही ग्रामीण महाराष्ट्रात हा शद्ब प्रचलित आहे यावरून काय ते ओळखावे. असो.

'अक्करमाशी' वाचताना आपण हताश होतो, दुःखाने गदगदून येतं. पानापानांतून लिंबाळेंच्या आईचा आणि पर्यायाने दलितांचा, महिलांचा आणि हक्काच्या अस्तित्वाशिवाय वाढलेल्या शरणकुमारांचा संघर्ष आपल्याला व्याकुळ करतो. मसाम ाईसारख्या स्त्रियांना सवर्ण पुरुषांनी लैंगिक शोषण करून पुढे समाजाने 'रांड' ठरवले याचा उद्वेग अस्वस्थ करवतो. लिंबाळे स्वतःला, आईच्या शोषणाचे फळ म्हणवतात! जाती आणि लिंगभेदाचे हे दुहेरी शोषण त्यांनी अत्यंत प्रभावीपणे मांडलेय.

आई मसामाईला गावातील पाटीलाने दासीसारखे वागवले. तिला 'रांड' म्हणून हिणवले जायचे याचे सल शरणुच्या मनात कायमचे राहतात. त्यांची आजी संतामाई आणि समाजातील इतर स्त्रियांचे जीवनही तितकेच यातनामय होते, भलेही त्यांच्या नात्यांना नावं होती तरीही त्यांचे आयुष्य कारुण्यात्मकच होतं. भूक, अपमान, जातीय भेदभाव हे लिंबाळेंच्या रोजच्या जगण्याचे भाग होते. शाळेत आणि गावात त्यांना हेतुतः 'अक्करमाशी' म्हणून टोमणे मारले जात. त्यांनी प्राथमिक शिक्षणापासूनच जातीय विषमतेचा सामना केला. त्याचीही कैफियत ह्या पुस्तकात आहे.

'अक्करमाशी' हा केवळ एका जातीचा, एका स्त्रीचा, एका आईचा आणि तिच्या मुलाचा संघर्ष नसून ज्यांचे अस्तित्व अधांतरी राहते त्यांच्या शोधयात्रेची सल आहे, जी कोणत्याही संवेदनशील माणसाला टोकरत राहते. मी कोण आहे, माझे वडील कोण आहेत, माझी जात कोणती आहे हे प्रश्न शरणकुमारना आयुष्यभर सतावत राहिले. त्याची धग आत्मकथेत टोकदारपणे जाणवते.

आपल्याकडे समाजाची उतरंड अनेक स्तरावर मांडली जाते. वर्ण, जात, गोत्र,धर्म, भाषा, प्रांत, लिंग अशा अनेक कॅटेगरीजचा आधार घेतला जातो. मात्र एक गोष्टीवर फोकस करणे चलाखीने टाळले जाते आणि ती म्हणजे कोणत्याही उतरंडीच्या तळाशी जो वर्ग असतो त्याच्याही खाली आणखी एक घटक असतो जो त्या सर्वात खालच्या वर्गातील स्त्रियांचा असतो! लिंबाळेंनी हा मुद्दा अतिशय जोरकसपणे मांडला असला तरी त्याला टिपिकल फेमिनिस्टीक शेडपासून दूर ठेवलेय.

'अक्करमाशी' हे आत्मकथन माराठी दलित साहित्यातील एक मैलाचा दगड मानले जाते. दया पवारांचे 'बलुतं', बेबी कांबळे यांचे 'जिणं आमुचं' यांच्याबरोबरच या पुस्तकाने दलित आत्मकथनाची परंपरा अधिक तीव्र आणि प्रामाणिक बनवली.

लिंबाळेंचे दुःख दुधारी तलवारीसारखे आहे कारण त्यांना सवर्ण समाजातही स्थान नव्हते आणि दलित समाजातही पूर्ण स्वीकार नव्हता; ते दोन्ही बाजूंनी बहिष्कृत आहे. ही 'अक्करमाशी' स्थिती पुस्तकाच्या मध्यवर्ती वेदनेचे कारण आहे. बटबटीतपणाला फाटा देऊन संयत शैलीत लिंबाळे स्वतःला उलगडत जातात आणि वाचणारा सोलून निघतो.

त्यांची भाषा अत्यंत साधी, प्रवाही असली तरी तिची शैली थेट भिडणारी आहे. साहित्यिक अलंकार किंवा सुंदर वाक्यरचना येथे दुय्यम आहेत. अनुभव इतके भीषण आहेत की भाषा स्वतःच वेदनेची वाहक बनते. ही शैली दलित साहित्याच्या, अनुभवप्रामाण्याच्या तत्त्वाला पूर्ण न्याय देते.

'अक्करमाशी'वर बरेच घमासान झाल्यावर काहींनी आक्षेप नोंदवला होता की, पुस्तकाच्या शेवटच्या टप्प्यात लिंबाळेंना, शिक्षण आणि नोकरी मिळाल्यानंतरही उच्चवर्णीय स्वीकृतीची अपेक्षा ठेवल्यासारखे काही भाग आहेत. त्याचबरोबर वैयक्तिक लिंबाळेंनी जगलेली वेदना इतकी तीव्र आहे की, व्यापक सामाजिक-राजकीय विश्लेषणाकडे त्यांनी कमी फोकस केलेय. मात्र वास्तवात हेच ह्या पुस्तकाचे भक्कम गुणलक्षण आहेत, ज्यामुळे ते अधिकाधिक सच्चे झालेय.

'अक्करमाशी' हे फक्त एका व्यक्तीचे आत्मकथन नाहीये. जातीव्यवस्थेने निर्माण केलेल्या अमानुषतेचा तो काटेरी दस्तावेज आहे. शरणकुमार लिंबाळे यांनी आपल्या वैयक्तिक वेदनेला सामूहिक वेदनेत रूपांतरित केलेय. हे पुस्तक वाचल्यानंतर वाचक अस्वस्थ होतो, आणि ही अस्वस्थताच या कलाकृतीचे यश आहे. मराठी दलित साहित्यात या पुस्तकाने 'मी कोण?' हा प्रश्न नव्याने उपस्थित केला आणि तो प्रश्न आजही प्रासंगिक आहे.

'अक्करमाशी'मधील काही हृदयद्रावक प्रसंग एकदा वाचल्यानंतर विसरणे कठीण आहे. ह्या आत्मकथेची सुरुवातच एका अत्यंत वेदनादायी प्रसंगाने होते. शाळेच्या सहलीत सवर्ण मुले आपल्या डब्यातील पदार्थ खातात. उरलेले अन्न ते फेकून देतात. लहान शरणकुमार ते उष्टे खरकटे गोळा करून आपल्या फाटक्या कपड्यात बांधून घरी आणतो. घरी आजी आईसाठी ते अन्न आणणे, हा त्याच्यासाठी आनंदाचा क्षण असतो. भुकेचे हे रौद्र रूप वाचताना कोणताही संवेदनशील माणूस अस्वस्थ होतो.

आठवडे बाजारचा एक प्रसंग असाच अंगावर येणारा आहे. बाजार संपल्यावर केळीच्या हातगाड्यापाशी केळी खाऊन त्यांच्या साली फेकून देतात. शरणकुमारची निरागस बहीण, वानी त्या साली गोळा करून खात बसते. तो रागाने तिला मारतो आणि साली फेकून देतो. पण क्षणार्धात त्याचे मन बदलते. तो स्वतः त्या मातीत माखलेल्या साली घेऊन नदीकिनारी जातो, स्वच्छ करून खाऊ लागतो. शिक्षकांना येताना पाहून तो घाईघाईने साली फेकून देतो. हा प्रसंग अत्यंत हृदयद्रावक आहे.

ह्या पुस्तकात शरणकुमारांची आई आपल्याला शब्दशः भेटते. ती विचार करण्यास भाग पाडते. 'आई अस्पृश्य, बाप सवर्ण! आई झोपडीत, बाप माडीत. बाप जमीनदार, आई भूमिहीन. आणि मी अक्करमाशी' असा सल लिंबाळे मांडत असले तरी त्यात विद्रोहापेक्षा कारुण्य अधिक आहे!

आई मसामाईला पाटलाने दासीसारखे वागवले, गावाने तिला हिणवले ह्याविषयी लिंबाळे नेमके भाष्य करतात. ते लिहितात की, 'आईला दोन गोष्टींमध्ये अडकवले होते, भाकर आणि लैंगिक शोषण!' पोटासाठी अस्तित्व पणाला लावणाऱ्या आईचे दुःख त्यांना आयुष्यभर सतावते.

तरुण शरणकुमार शेवंता नावाच्या मुलीच्या प्रेमात पडतो. पण तो अक्करमाशी असल्याने ते नाते पुढे जाऊ शकत नाही. एकदा पाणी उधळताना शेवंता म्हणते, शरण, मला भिजवू नकोस. माझ्याकडे बदलण्यासाठी दुसरे कपडे नाहीत. हे साधे वाक्य त्याच्या मनाला तीव्र वेदना देऊन जाते.

लिंबाळेंची आजी संतामाई दारोदार फिरून जोगवा मागत असे. कधी कधी मृत जनावरांचे मांस किंवा शेणातून गोळा केलेले ज्वारीचे दाणे भाजून भाकर करून खावी लागे. भुकेपोटी अशा टोकाच्या गोष्टी कराव्या लागल्याची वर्णने अत्यंत तीव्र आहेत.

एका प्रसंगातले वर्णन अगदी भेदक आहे. खेड्यांनी गुरांनां जुंधळयाची ताटं खाऊ घातली जातात. बऱ्याचदा त्यांच्या शेणातून ज्वारीचे कण जसेच्या तसे पडतात. लहानगा शरणु शेणातली ज्वारी गोळा करण्याचे काम करत असतो. ती ज्वारी भाकरी करण्यासाठी वापरली जाते, मात्र भाकर खाताना तिला शेणकुटाचा वास येतो!

हा दर्प लिंबाळेंचा पिच्छा सोडत नाही. लिंबाळेंनी त्यामागच्या गंधभारित जगाला शब्दात पकडलंय! ती त्यांच्या आयुष्याची सल आहे, जगण्याची वीण आहे, जन्मखूण आहे आणि सरतेशेवटी त्यांच्या कारुण्याष्टकाचे मातृस्तोत्र आहे!

कदाचित यामुळेच, त्यांच्या लेखनाचा बाज विद्रोहाचा अथवा आक्रमकतेने सवाल करण्याचा नसून कारुण्यात्मकतेने ते अन्यायाचे, दुःखाचे पदर उलगडत जातात. प्रस्थापितांना थेट टक्कर देण्याची भाषा त्यांची पात्रे क्वचित करतात, विषमता आणि शोषण ह्यावर ते बोलतात मात्र त्यांनी लिपी जवळिकीची आणि क्षमेची आहे!

१०० व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी त्यांची निवड झालीय ही गोष्ट निश्चितच आनंदाची आहे. त्यांच्या निवडीतून कुणी सामाजिक राजकीय संदेश शोधत असेल तर त्यात गैर नाही कारण अलीकडील काळात साहित्यक्षेत्रात अन्य कोणत्याही क्षेत्राचा हस्तक्षेप आता न्यू नॉर्मल झालाय.

जातीभेदाचे आणि शोषणाचे टोकदार दुःख सोसलेल्या संयमी लेखकाची निवड इतकाच ह्या निवडीचा अर्थ न राहता समाजात देखील समतेची बीजे खऱ्या अर्थाने खोलवर रुजली जावीत अशी अपेक्षा बाळगणे अतिरंजित ठरू नये!

१०० व्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल आदरणीय शरणकुमार लिंबाळे सरांना मनःपूर्वक शुभेच्छा!

– समीर गायकवाड

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

निफाड एसबीआयच्या एटीएममध्ये ५०० रुपयांच्या बनावट नोटा; संशयिताला अटक

४७ बनावट नोटा भरल्याचा प्रकार उघड; २७ नोव्हेंबरपर्यंत पोलीस कोठडी

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

निफाड/प्रतिनिधी : निफाड येथील स्टेट बँक ऑफ इंडिया (एसबीआय) शाखेच्या एटीएममध्ये ५०० रुपयांच्या बनावट नोटा जमा करून बँकेची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी निफाड पोलिसांनी संशयित आरोपी संदीप रंगनाथ निकम (रा. फ्लॅट क्रमांक ए-१३, माधव पार्क अपार्टमेंट, दामोदर नगर, पंचक, जेलरोड, नाशिक) याला अटक केली आहे. न्यायालयात हजर केले असता त्याला २७ नोव्हेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

याप्रकरणी एसबीआय बँकेचे उपव्यवस्थापक हेमंत अशोकराव पाटील यांनी निफाड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार ३ नोव्हेंबर रोजी सकाळी ९.४१ ते ९.४५ या अवघ्या चार मिनिटांच्या कालावधीत संशयिताने बँकेच्या एटीएम व सीडीएम मशीनम ध्ये ५०० रुपयांच्या भारतीय चलनासारख्या दिसणाऱ्या ४७ बनावट नोटा जमा केल्याचे समोर आले. या नोटांची एकूण किंमत २३ हजार ५००ज रुपये आहे.

याप्रकरणी २१ नोव्हेंबर रोजी निफाड पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ४०९/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या कलम १७९, १८० व ३१८(२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

पोलीस निरीक्षक अहिराव यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथकाने घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेज आणि म ोबाईल तांत्रिक माहितीच्या आधारे तपास करून संशयिताला २४ नोव्हेंबर रोजी अटक केली. न्यायालयाने त्याला २७



नोव्हेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली असून, या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

माजी सैनिकाची शेतीतही दमदार कामगिरी; ६० गुंठ्यांत घेतले ११५ टन उसाचे उत्पादन



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

टाकळीवाडी/प्रतिनिधी : टाकळीवाडी : तालुका शिरोळ येथील सुपुत्र केंदबा श्रीकांत कांबळे माजी सैनिक यांनी देशसेवेचे २६ वर्षांचे कर्तव्य यशस्वीपणे पार पाडल्यानंतर निवृत्त झालेले टाकळीवाडी (ता. शिरोळ) येथील माजी सैनिक केंदबा श्रीकांत कांबळे यांनी शेतीतही उल्लेखनीय यश संपादन केले आहे. देशसेवेनंतर सामाजिक कार्याबरोबरच शेती करण्याचा ध्यास घेत त्यांनी आपल्या जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर शेतीत नवा आदर्श निर्माण केला आहे.

विशेष म्हणजे, निवृत्तीनंतर शेती करण्याचा निर्णय घेताना त्यांना पिकांना पाणी कसे द्यायचे, शेतीचे नियोजन कसे करायचे, याची फारशी माहिती नव्हती. मात्र, शिकण्याची तयारी आणि कष्ट करण्याची जिद्द यांच्या बळावर त्यांनी ६० गुंठे जमीन खरेदी केली. या जमिनीमध्ये १५ जुलै २०२५ रोजी ८६०३२ जातीच्या उसाची लागवड केली.

माळरानासारख्या जमिनीत योग्य नियोजन, मेहनत आणि सातत्य ठेवत त्यांनी अवघ्या ६० गुंठ्यांत तब्बल ११५ टन उसाचे उत्पादन घेतले. त्यांच्या या यशामुळे शेतीबद्दलची आवड, जिद्द आणि कष्ट करण्याची तयारी असेल तर कोणत्याही परिस्थितीत यश मिळवता येते, हे त्यांनी सिद्ध करून दाखवले आहे.

२६ वर्षे देशाच्या सीमेवर राहून देशसेवा करणाऱ्या या माजी सैनिकाने निवृत्तीनंतर शेतीच्या माध्यमातूनही आप-ली कर्तृत्वाची छाप उमटवली आहे. त्यांच्या या प्रेरणादायी कामगिरीचे टाकळीवाडीसह परिसरातील शेतकरी वर्गातून कौतुक होत असून, केंदबा श्रीकांत कांबळे यांचे सर्व स्तरांतून मनःपूर्वक अभिनंदन होत आहे.

श्री विठ्ठल रुक्मिणी मातेची २८ नोव्हेंबर रोजी प्रक्षाळपूजा; दर्शनाच्या वेळेत बदल

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर : कार्तिकी यात्रेच्या सोहळ्यानंतर करण्यात येणारी श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेची प्रक्षाळपूजा शनिवार, दि. २८ नोव्हेंबर रोजी संपन्न होणार आहे. या प्रक्षाळपूजेनिमित्त श्रींच्या दर्शनाच्या वेळेत बदल करण्यात आला असून, काही कालावधीत पदस्पर्श दर्शन बंद राहणार आहे. तथापि, मुखदर्शन नेहमीप्रमाणे सुरू राहणार आहे.

दरवर्षी कार्तिकी यात्रेच्या कालावधीत भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत असते. भाविकांना जास्तीत जास्त वेळ दर्शनाचा लाभ घेता यावा, यासाठी योग्य मुहूर्त व दिवस पाहून श्रींचा पलंग काढण्यात येतो. यंदा दि. १४ नोव्हेंबर रोजी श्रींचा पलंग काढण्यात आला होता. त्यानंतर काकडा आरती, पोशाख, धुपारती, शेजारती आदी राजोपचार बंद करून नित्यपूजा, महानैवेद्य व गंधादक्षा हे राजोपचार सुरू ठेवण्यात आले होते. आता हे सर्व राजोपचार पूर्ववत सुरू



करण्यासाठी शनिवार, दि. २८ नोव्हेंबर रोजी श्रींची विधिवत प्रक्षाळपूजा करण्यात येणार आहे, अशी माहिती मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी श्रीकांत यादव यांनी दिली.

प्रक्षाळपूजेनिमित्त शनिवार, दि. २८ नोव्हेंबर रोजी श्रींचे पदस्पर्श दर्शन पहाटे ५.०० ते दुपारी १२.२०, दुपारी १२.३० ते २.१०, सायंकाळी ५.३० ते ६.४५ आणि रात्री ७.१० ते ११.३० या वेळेत सुरू रा-हणार आहे. तर दुपारी १२.२० ते १२.३०, दुपारी २.१० ते सायंकाळी ५.३० आणि सायंकाळी ६.४५ ते ७.१० या वेळेत श्रींचे पहिले स्नान, म हाअभिषेक, अलंकार, महानैवेद्य व धुपारती हे धार्मिक विधी संपन्न होणार असल्याने पदस्पर्श दर्शन बंद राहणार आहे. या कालावधीत भाविकांसाठी श्रींचे मुखदर्शन मात्र नेहम ीप्रमाणे सुरू राहणार आहे.

या प्रक्षाळपूजेच्या धार्मिक विधीमध्ये श्री विठ्ठलास ११ ब्रह्मवृंदांच्या हस्ते रुद्राभिषेक, तर श्री रुक्मिणी मातेस ११ ब्रह्मवृंदांच्या हस्ते पवमान अभिषेक करण्यात येणार आहे. तसेच श्री विठ्ठलाची प्रक्षाळपूजा मंदिर समितीचे सन्माननीय सदस्य अतुल शास्त्री भगरे गुरुजी यांच्या शुभहस्ते, तर श्री रुक्मिणी मातेची प्रक्षाळपूजा मंदिर समितीचे व्यवस्थापक प्रवीणकुमार घाम यांच्या शुभहस्ते संपन्न होणार आहे,

भाविकांनी दर्शनाच्या वेळेतील बदलाची नोंद घेऊन नियोजन करावे व मंदिर समि तीस सहकार्य करावे, असे आ-वाहन श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने करण्यात येत असल्याचे यावेळी व्यवस्थापक प्रविणकुमार घम यांनी सांगितले.

पुणे येथील 'कॉलेज समिट २०२६' मध्ये स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचा सन्मान

स्वेरीला मिळाला मानाचा 'व्हॅल्यूड पार्टनरशिप अवॉर्ड'

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर : 'मॅजिक बस इंडिया फाउंडेशन'च्या वतीने पुणे येथे आयोजित करण्यात आलेल्या 'कॉलेज समिट २०२६' मध्ये गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) चे प्रतिनिधित्व करताना संस्थेला 'व्हॅल्यूड पार्टनरशिप अवॉर्ड' आणि 'प्रशस्तिपत्रक' (सर्टिफिकेट ऑफ अप्रेशिएशन) देऊन सन्मानित करण्यात आले. वाणिज्य महाविद्यालय (एमएमसीसी) चे प्राचार्य किशोर निकम यांच्या हस्ते ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाचे अधिष्ठाता प्रा. रविराज माढेकर यांनी संस्थेच्या वतीने हा सन्मान स्विकारला.

याच समिटमध्ये स्वेरीच्या एमसीए विभागाचे प्रमुख प्रा. मनसब शेख यांचाही विशेष पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासासाठी, आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून रोजगाराभिमुख शिक्षणाला चालना देण्यासाठी तसेच उद्योग आणि शैक्षणिक संस्था यांच्यातील समन्वय अधिक दृढ करण्यासाठी केलेल्या कार्याच्या अनुषंगाने त्यांचा गौरव करण्यात आला. याबरोबरच या कार्यक्रम ात स्वेरीच्या उपप्राचार्या डॉ. श्रीमती मि नाक्षी पवार आणि ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाचे अधिष्ठाता डॉ. अभिषेक एम. एस. यांचाही विशेष सन्मान करण्यात आला. यापूर्वी स्वेरी संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगला अनेक पुरस्कारांनी



सन्मानित केले आहे. यंदाचा 'व्हॅल्यूड पार्टनरशिप अवॉर्ड' स्विकारल्यानंतर अधिष्ठाता प्रा. रविराज माढेकर यांनी सांगितले की, 'कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि नवीन तंत्रज्ञानामुळे आधुनिक कार्यक्षेत्राचे स्वरूप वेगाने बदलत आहे. या बदलत्या परिस्थितीत विद्यार्थ्यांसाठी रोजगाराच्या नवनवीन संधी उपलब्ध करून देण्यासाठी आघाडीच्या तंत्रज्ञान कंपन्यांशी (टेक कंपनीज्) मजबूत भागीदारी निर्माण करणे हे काम अत्यंत महत्त्वाचे आहे. या समिटमधून मि ळालेल्या अनुभवाचा आणि विचारांचा वापर करून विद्यार्थ्यांमध्ये उद्योगांच्या गरजेनुसार कौशल्य विकास (स्किल डेव्हलपमेंट) घडवून आणण्यासाठी तसेच महाविद्यालयात प्रभावी कॅम्पस प्लेसमेंट उपक्रम राबवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत,' असा विश्वासही प्रा. माढेकर यांनी यावेळी व्यक्त केला. यावेळी मनोगत व्यक्त करताना एमसीए विभागप्रमुख प्रा. मनसब शेख यांनी सांगितले की, 'सध्याच्या बदलत्या तंत्रज्ञानाच्या युगात विद्यार्थ्यांना केवळ पारंपरिक शैक्षणिक ज्ञान देणे पुरेसे नसून त्यांच्यामध्ये उद्योगाभिमुख कौशल्ये, तांत्रिक क्षमता, समस्या निराकरणाची वृत्ती आणि रोजगारक्षमतेचा विकास करणे आवश्यक आहे. मॅजिक बस इंडिया फाउंडेशनसारख्या संस्थांसोबतचे सहकार्य विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष उद्योगविश्वातील संधी आणि आवश्यक कौशल्यांची ओळख करून देण्यासाठी उपयुक्त ठरत आहेत. या सन्मानामुळे स्वेरीच्या शैक्षणिक व कौशल्य विकासविषयक उपक्रमांना अधिक बळ मिळेल,' असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. मॅजिक बस इंडिया फाउंडेशनसोबतची भागीदारी, विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासासाठी राबविण्यात येणारे विविध उपक्रम आणि उद्योगाभिमुख शिक्षणासाठी स्वेरी करत असलेले सातत्यपूर्ण प्रयत्न यांची ही पावती मानली जात आहे. हा सन्मान म्हणजे स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या सामूहिक प्रयत्नांचा, गुणवत्तापूर्ण शैक्षणिक कार्याचा आणि उद्योगविश्वाशी असलेल्या दृढ संबंधांचा गौरव आहे. स्वेरीला मिळालेल्या या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) चे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे, संस्थेचे अध्यक्ष अशोक भोसले, उपाध्यक्ष सुरेश राऊत, सचिव डॉ. सुरज रोंगे, संस्थेचे इतर पदाधिकारी व विश्वस्त, सर्व संचालक मंडळ, बी. फार्मसीचे प्राचार्य डॉ. एम. जी. मणियार, डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. एन. डी. मिसाळ, डी. फार्मसीचे प्राचार्य डॉ. एस. व्ही. मांडवे, स्वेरी लॉ कॉलेजच्या प्राचार्या डॉ. बनकर, पदवी इंजिनिअरिंगच्या उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, इतर अधिष्ठाता, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी अभिनंदन केले आहे.

स्वेरीकडून विद्यार्थ्यांना रोजगाराच्या अधिकाधिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. चालू शैक्षणिक वर्षात आतापर्यंत २४ कंपन्यांनी कॅम्पस भरती प्रक्रियेत सहभाग घेतला असून विद्यार्थ्यांना २३ कंपन्यांकडून ६३८ ऑफर्स प्राप्त झाल्या आहेत तसेच ३४९ विद्यार्थ्यांना स्टायपेंडसह इंटर्नशिप आणि ३५० विद्यार्थ्यांना संभाव्य प्री-प्लेसमेंट ऑफरची संधी उपलब्ध आहे. अजूनही ही प्रक्रिया सुरूच आहे. सुमारे १२०० कंपन्यांशी प्लेसमेंटसाठी संपर्क साधण्यात आला असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण रोजगार क्षमतेसाठी एप्टीट्युड, इंग्रजी संभाषण, सॉफ्ट स्किल्स, मुलाखत तंत्र, कॅम्पस टू कॉर्पोरेट, आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि विभागनिहाय तांत्रिक प्रशिक्षण असे नियोजनबद्ध उपक्रम राबविण्यात येत आहेत.

पान १ वरून...

दुष्काळग्रस्त ३३ जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना तीन महिने मोफत धान्य मिळणार

२००९ यांमध्ये काही उणिवा आढळल्या आहेत. त्या दूर करून शाळांच्या कामकाजात अधिक प्रभावी नियमन आणण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. या विधेयकात सुमारे २० प्रकरणांचा समावेश आहे. खासगी अनुदानित शाळांचे प्रशासन नियंत्रित करण्याचे शासनाचे अधिकार, शाळांची दर्जावाढ, अतिरिक्त तुकडीला मान्यता, शाळा समिती, अल्पसंख्याक खासगी अनुदानित शाळांसाठी विशेष तरतुदी, शाळांची जबाबदारी, शाळा, तुकडी किंवा माध्यम बंद करण्याची प्रक्रिया आणि परस्पर सहमतीने शाळांचे हस्तांतरण यांचा त्यात समावेश आहे. व्यवस्थापनातील वादामुळे प्रभावित झालेल्या शाळांमधील शिक्षक भरतीसाठी विशेष तरतुदी, शाळेच्या वेळेनंतर मैदान, इमारत आणि अन्य सुविधांचा वापर, समान स्वरूपाच्या प्रकरणांसाठी एकसमान कार्यपद्धती, शाळांना अनुदान आणि शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीबाबतही विधेयकात तरतुदी करण्यात आल्या आ-हेत. याशिवाय शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवाशर्ती, शाळा न्यायाधिकरण, तक्रार निवारण समिती, दंडात्मक कारवाई, कसूरदार व्यवस्थापनाविरुद्धची कार्यवाही, लेखे व लेखापरीक्षण, अपील आणि पुनर्विलोकन यांसारख्या बाबींचाही समावेश आहे. खासगी अनुदानित शाळांमधील शैक्षणिक गुणवत्ता वाढवणे, विद्यार्थ्यांची सुरक्षा सुनिश्चित करणे, सक्षम आणि जबाबदार प्रशासन निर्माण करणे, तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवाशर्तींचे संरक्षण करणे, ही या विधेयकाची प्रमुख उद्दिष्टे आहेत. पारदर्शक आणि गुणवत्तापूर्ण पदभरतीसह खासगी अनुदानित शाळांच्या काम काजात उत्तरदायित्व आणण्यावरही भर देण्यात आला आहे. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० यांमधील गुणवत्तापूर्ण, पारदर्शक आणि उत्तरदायी शिक्षणव्यवस्थेच्या उद्दिष्टांशी सुसंगत अशी कायदेशीर चौकट या विधेयकातून निर्माण होणार आहे.

कालव्याच्या वाहत्या पाण्यात सहा जणांना फेकलं, पाच जणांचा मृत्यू

निमित्ताने जळगाव शहरातून गुजरातकडे निघालेले हे कुटुंब नवीन रोजगाराच्या शोधात असताना अज्ञात व्यक्तींनी त्यांचा रस्ता अडवून कुटुंबावर प्राणघातक हल्ला करून बारडोली तालुक्यातील उवा गावाजवळील तलावात फेकून दिल्याची माहिती समोर आली होती. या घटनेत कविता संजय पाटील, नितीन उर्फ भुच्या यांच्यासह अन्य तिघांचा असे एकूण ५ जणांचा मृत्यू झाला, तर १३ वर्षीय चिमुकला बचावला आहे. या घटनेनंतर गुजरात आणि जळगाव पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली. दरम्यान, या प्रकरणात विमा फसवणुकीचे धागेदोरे समोर आले आहेत. चाळीसगाव तालुक्यातील मेहुणबारे पोलीस ठाण्यात दाखल एका गुन्ह्यात मयत महिला कविता पाटील हिचे पहिले पती संजय यांच्या मृत्यूला अपघाताचे स्वरूप देऊन विमा कंपनीकडे अपघाताचा अहवाल सादर करण्यात आल्याचे समोर आले आहे. विम्याची रक्कम हडप करण्याच्या उद्देशाने कंपनीची फसवणूक केल्याचा संशय या दोघांसह अन्य काही जणांवर व्यक्त केला जात आहे. या प्रकरणात मयत कविता संजय पाटील, तिच्यासोबत असलेले नितीन पाटील आणि अन्य व्यक्तींचा सहभाग असल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाल्याची माहिती आहे. या संदर्भातील गुन्हा १९ नोव्हेंबर रोजी दाखल करण्यात आला होता. दरम्यान, मेहुणबारे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. तसेच बारडोली येथील घटनेतील धागेदोरे समोर आल्यानंतर गुजरात आणि जळगाव पोलीस परस्पर समन्वयाने पुढील तपास करत आहेत. या प्रकरणातील कारचालक दयानंद भदाणे उर्फ खंड्या याला संशयित म्हणून ताब्यात घेण्यात आले असून, पुढील चौकशीसाठी गुजरात पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. या संपूर्ण प्रकरणाबाबत अपर पोलीस अधीक्षक संदीप गावित यांनी माहिती दिली आहे. मेहुणबारा पोलिस ठाण्यात अजून एका विमा कंपनी घोटाळ्यात चार पोलिसांच्या विरोधात ही गुन्हा दाखल करण्यात आला असून,ते कारागृहात असताना त्यांना पोलिस दलातून बडतर्फ करण्यात आले आहे. पोलिस कर्मचारी आणि बारडोली घटना याचा काही संबंध आहे का याचा जळगाव पोलिस तपास करत आहेत.

पुणे कोर्ट गोळीबार प्रकरणात पाच आरोपींना अटक; क्राईम ब्रँचची कारवाई

शिवाजीनगर न्यायालयाच्या गेट नंबर ४ जवळ हा थरार घडला. कात्रज भागातील रहिवासी असलेला मंदार किवळे हा कोर्टातील सुनावणी आटोपून गेट नंबर ४ बाहेर आला असता, दोन दुचाकीवरून आलेल्या ६ हल्लेखोरांनी त्याला घेरले. हल्लेखोरांनी आधी त्याच्यावर पिस्तुलातून गोळीबार करण्याचा प्रयत्न केला आणि त्यानंतर हातातील कोयत्यांनी त्याच्यावर सपासप जीवघेणे वार केले.

भर गर्दीत झालेल्या या हल्ल्यामुळे न्यायालय परिसरात मोठा गोंधळ आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले. या हल्ल्यात मंदार किवळे गंभीर जखमी झाला असून, त्याला तातडीने उपचारासाठी ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या हल्ल्यामागे गुन्हेगारीची जुनी पार्श्वभूमी आणि वैमनस्य असल्याचा प्राथमिक संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. जखमी मंदार किवळे हा २०२५ मध्ये झालेल्या शुभम चव्हाण हत्या प्रकरणातील आरोपी असून, नुकताच तो जामिनावर बाहेर आला होता. आज या प्रकरणाच्या सुनावणीसाठी तो कोर्टात आला असता, शुभमच्या हत्येचा बदला घेण्यासाठी हा हल्ला झाल्याचा पोलिसांचा अंदाज आहे. दरम्यान, फरार आरोपींच्या मुसक्या आवळण्यासाठी पुणे पोलिसांची ८ ते १० विशेष पथके तैनात करण्यात आली होती, ज्यांना मोठी काम गिरी बजावण्यात यश आले आहे. मात्र, न्यायालयासारख्या अतिसंवेदनशील परिसरात शस्त्रे घेऊन येण्याची हिंमत हल्लेखोरांमध्ये निर्माण होतेच कशी? असा सवाल आता पुणेकर उपस्थित करत आहेत.

महाद्वार काल्याने कार्तिकी यात्रेची सांगता

२८ नोव्हेंबर रोजी श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेची प्रक्षाळ पूजा

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर : श्री क्षेत्र पंढरपूर येथे कार्तिकी यात्रेच्या धार्मिक सोहळ्याची सांगता बुधवार, दि. २५ नोव्हेंबर रोजी पारंपरिक महाद्वार काला उत्सवाने झाली. श्री विठ्ठल सभामंडप येथे महाद्वार काल्याचा उत्सव मोठ्या भक्तिभावाने व उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.



श्री हरिदास, नामदास महाराज, पुजारी तसेच विविध समाजबांधवांच्या सहभागातून हा पारंपरिक सोहळा पार पडला.

यावेळी श्री विठ्ठल सभामंडपात पाच प्रदक्षिणा घालण्यात आल्या व त्यानंतर दहीहंडी फोडून काल्याचा उत्सव साजरा करण्यात आला. पुढे नामदेव पायरीमार्गे काल्याचे महाद्वाराकडे प्रस्थान झाले. यावेळी भाविकांनी मोठ्या भक्तिभावाने या सोहळ्यात सहभाग नोंदविला.

कार्तिकी यात्रेच्या कालावधीत श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा तसेच सर्व पारंपरिक प्रथा व परंपरांचे मंदिर समितीच्या वतीने काटेकोरपणे पालन करण्यात आले. यात्रेचा संपूर्ण धार्मिक कार्यक्रम नियोजनबद्ध पद्धतीने पार पाडण्यात आला.

यावेळी मंदिर समितीचे लेखाधिकारी श्री. मुकेश अनेचा, विभागप्रमुख श्री. संदीप कुलकर्णी यांच्यासह मंदिर समितीचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

कार्तिकी यात्रेच्या सांगतेनंतर आता शनिवार, दि. २८ नोव्हेंबर रोजी श्री विठ्ठल व श्री रुक्मिणी मातेची प्रक्षाळ पूजा पारंपरिक धार्मिक विधीनुसार संपन्न होणार आहे, अशी माहिती मंदिर समितीचे व्यवस्थापक श्री. प्रवीणकुमार घम यांनी दिली.

मदतीची गरज असलेल्या तेर येथील वृद्ध ज्येष्ठ नागरिक महिलेस ज्येष्ठ नागरिक महासंघाकडून किराणा वस्तू किटची मदत

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क



कळंब/प्रतिनिधी : तेर येथील वृद्ध ज्येष्ठ नागरिक महिला, धोंडाबाई गणपती गाडे वय (९०) अत्यंत हालाखीच्या स्थितीमध्ये जीवन जगत आहे सदरहू महिला शासनाच्या विविध योजनेपासून वंचित असून मदतीची गरज आहे याची माहिती मिळाल्यानंतर ज्येष्ठ नागरिक महासंघाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष सन्माननीय अण्णासाहेब टेकाळे मुंबई यांनी याची दखल घेत सदरहू महिलेस मदत करण्याविषयी धाराशिव जिल्हा ज्येष्ठ नागरिक महासंघ यांना सूचना केली. यानुसार धाराशिव जिल्हा ज्येष्ठ नागरिक समन्वय समितीचे अध्यक्ष महादेव महाराज अडसूळ , ज्येष्ठ नागरिक महासंघ दक्षिण मराठवाडा विभाग प्रदेश सचिव अमृतराव टेकाळे (वाटवडा)धाराशिव जिल्हा ज्येष्ठ नागरिक महासंघाचे जिल्हा उपाध्यक्ष राजाभाऊ आंधळे (तेर) धाराशिव जिल्हा मुख्याध्यापक संघाचे जिल्हाध्यक्ष सुरेश टेकाळे कळंब ज्येष्ठ नागरिक कळंब तालुका सचिव माधवसिंग राजपुत, संदीप कोकाटे, प्रदीप टेकाळे, अपंग संघटनेचे नारायण सोळंके (तेर) तेर गावचे माजी सरपंच भारत नाईकवाडी यांनी वृद्ध महिलेच्या घरी प्रत्यक्ष जाऊन सर्व चौकशी व विचारपूस करून अडचणी व समस्या जाणून घेतल्या व या महिलेस जीवनावश्यक किराणा किट देऊन मदत केली व ९० वर्ष वय असलेल्या व हलाखीचे जीवन जगत असलेल्या महिलेस अल्पशी मदत म्हणून दैनंदिन गरजेच्या किराणा वस्तू किट व मायेची शाल देऊन सत्कार केला. सदरील महिलेस जगण्यासाठी व्यवस्था नसल्याने स्वतः वृद्ध असल्याने व एका जागी बसून आहे, मुलगा हि ६५ वर्ष वयावरील असून भोळसर आहे, तोही उपजीविकेसाठी भटकंती करतो, वृद्ध महिलेस अनेक समस्यांना सामना करावा लागत आहे. राहण्यासाठी जुने घर असून पावसाळ्यात घरात पाणी साचते, तसेच लाईटची व्यवस्था नसल्याने अंधारात राहावे लागते, पिण्यासाठी पाणी जवळपास उपलब्ध नाही, वृद्धत्व अपंगत्व यामुळे दवाखान्यात उपचार घेता येत नाहीत, ज्येष्ठ नागरिकांसाठी असलेली वृद्धापकाळ पेन्शन योजनेचा लाभ बंद आहे, याशिवाय रेशन कार्ड वरील अन्नधान्य ही मिळत नाही याविषयी धाराशिव तहसील कार्यालयाकडे प्रदेशाध्यक्ष अण्णासाहेब टेकाळे यांनी दूरध्वनी द्वारे विचारणा केली असता केवायसी नसेल असे उत्तर मिळाले, सदरील महिलेचे वृद्धत्वामुळे हाताचे बोटाचे ठसे मिळत नाही , डोळ्याचा फोटो निघत नाही यासाठी शासनाने ग्रामपंचायतचे हयात सर्टिफिकेट ग्राह्य धरावे अशी मागणी याप्रसंगी उपस्थित असलेल्या ग्रामस्थांनी केली.

ग्रामीण भागातील वृद्ध,ज्येष्ठ नागरिक,व महिला यांना अनेक समस्या आडचणी आहेत, परंतु त्यांच्यासाठी शासनाच्या सुविधा पोहोचत नाहीत या प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांची ज्येष्ठ नागरिक महासंघाचे शिष्टमंडळ भेट घेऊन चर्चा करणार आहे.

– अण्णासाहेब टेकाळे , प्रदेशाध्यक्ष ज्येष्ठ नागरिक महासंघ मुंबई.



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य अतुलनीय : धनंजय देशमुख

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

निफाड /प्रतिनिधी : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची अद्वितीय राजकीय दूरदृष्टी होती त्या केवळ एक आदर्श राज्यकर्त्या नव्हत्या, तर त्या एक मुत्सद्दी राजकारणी देखील होत्या.पती आणि मुलाच्या निधनानंतर अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी होळकरशाहीची धुरा समर्थपणे सांभाळली.ब्रिटिश साम्राज्याची वाढती ताकद ओळखून त्यांनी मुत्सद्देगिरीने आपल्या राज्याचे स्वातंत्र्य अबाधित ठेवले.रयतेवर अन्यायकारी कर न लादता राज्याची अर्थव्यवस्था मजबूत करून चोख आणि निःपक्षपाती न्यायव्यवस्था राबविण्याऱ्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य अतुलनीय होते असे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ बहि:शाल शिक्षण मंडळ व श्री माणकेश्वर वाचनालय निफाड यांच्या संयुक्त विद्यमाने न्यू इंग्लिश स्कूल पालखेड विद्यालयात आयोजित केलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर व्याख्यानमालेचे प्रथम पुष्प गुंफताना केले.त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर,सरस्वती माता यांच्या प्रतिमेचे पूजन करून दीपप्रज्वलन करण्यात आले.याप्रसंगी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष निवृत्तीनाना थेटे,व्याख्याते प्रा.धनंजय देशमुख, श्री माणकेश्वर वाचनालयाचे अध्यक्ष मधुकरराव शेलार, मुख्याध्यापक संजय दिघे,जेष्ठ शिक्षक अशोक शेळके,चिटणीस सुनील चिखले, सहचिटणीस राहुल दवते,संचालक विजय धारराव, माजी संचालक अशोक पगारे, भाऊसाहेब शिंदे, सहचिटणीस राहुल दवते,ग्रंथपाल नितीन बनसोडे आदी होते.पुढे बोलतांना धनंजय देशमुख यांनी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे राजकीय कार्य' विस्तृत सांगून त्यांनी महिलांची स्वतंत्र फौज उभारून त्यांना लष्करी प्रशिक्षण देणे ही त्यांच्या राजकीय धोरणाची मोठी वैशिष्ट्ये होती.तसेच मंदिरे,बारव, घाट आणि धर्मशाळा बांधून त्यांनी संपूर्ण देशाला सांस्कृतिकदृष्ट्या जोडण्याचे मोठे राष्ट्रीय कार्य केल्याचे सांगितले.त्यानंतर माणकेश्वर वाचनालयाचे सहचिटणीस राहुल दवते यांनी प्रास्ताविकात वाचनालयाचे कार्य, उपक्रमांची विस्तृत माहिती देऊन व्याख्यानाच्या आयोजनामागील मुख्य उद्देश स्पष्ट केला. यावेळी पाहुण्यांचा परिचय वाचनालयाचे चिटणीस सुनील चिखले यांनी करून दिला.याप्रसंगी मुख्याध्यापक संजय दिघे,अशोक शेळके, निलेश गवांदे,सौ. सुनंदा दुर्धवळे ,संजय लव्हांगडे, मंगेश कागदे, शैलेश शिखरे,राहुल दवते,किरण थेटे, सागर जाधव,राजेंद्र नाठे, संदीप आहेर, दत्तात्रय पगार, सावन जाधव, संजय कोकतरे,सौ.कविता ढोमसे,सौ. सारिका पवळे,सौ. वैशाली मोते,ज्ञानेश्वर मातेरे,सुरेश गांगुर्डे, रामदास पवार, नदीम तांबोळी आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संदीप आहेर यांनी तर आभार वाचनालयाचे अध्यक्ष मधुकरराव शेलार यांनी मानले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

ग्रामपंचायत माध्यमातून तांबरवाडी-राजेवाडी गावांचा विकासात्मक कायापालट

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

प्रतिनिधी/अमर जाधव : जे जे नवं, ते ते गावाला हवं!' या संकल्पनेतून व औसा तालुक्याचे लोकप्रिय आमदार अभिमन्यू पवार साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली व विकास निधीतून गावच्या विकासकामांना गती; सरपंच राधाकृष्ण जाधव व पंचायत समिती सदस्य तथा उपसरपंच राम बिराजदार यांचे मोलाचे योगदान.



औसा तालुक्यातील तांबरवाडी व राजेवाडी गावांच्या सर्वांगीण विकासाला ग्रामपंचायतीच्या माध्यमातून नवी दिशा मिळत असून, गावांचा विकासात्मक कायापालट करण्याच्या दृष्टीने विविध विकासकामे हाती घेण्यात आली आहेत. सरपंच राधाकृष्ण जाधव व पंचायत समिती सदस्य तथा उपसरपंच राम बिराजदार यांच्या संकल्पनेतून गावाच्या विकासाची वाटचाल सुरू आहे.

ख तंत्रज्ञानाचा वापर करून'जे जे नवं, ते ते गावाला हवं' ही संकल्पना डोळ्यांसमोर ठेवून गावातील मूलभूत सुविधांसह आधुनिक विकासकामांवर भर दिला जात आहे. यामध्ये गावातील सूक्ष्म पाणी नियोजन, अंतर्गत रस्त्यांची सुधारणा, शेतकऱ्यांचा शेतीपर्यंतचा प्रवास सुखकर व्हावा यासाठी शेतरस्ते व शिवरस्त्यांची कामे, गावातील विद्युतीकरण अशा विविध कामांचा समावेश आहे. विशेष म्हणजे, तांबरवाडी व राजेवाडी गावात दोन बोरवेल घेतले व त्या बोअरला मुबलक पाणी लागल्याने नागरिकांच्या पाण्याचा प्रश्न मिटवत ग्रामस्थांच्या आरोग्याचा विचार करून शुद्ध व फिल्टरयुक्त पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीनेही प्रयत्न करण्यात आले आहेत. गावातील प्रत्येक नागरिकाला मूलभूत सुविधा मिळाव्यात, शेतकऱ्यांच्या अडचणी दूर व्हाव्यात आणि गावाचा विकास आधुनिकतेच्या दिशेने व्हावा, हा या विकासकामांमागील मुख्य उद्देश आहे. केवळ मूलभूत सुविधांपुरता विकास मर्यादित न ठेवता गावाच्या गरजा ओळखून भविष्यातील विकासाचे नियोजन करण्यावर ग्रामपंचायतीचा भर असल्याचे चित्र दिसून येत आहे. सरपंच राधाकृष्ण जाधव व उपसरपंच राम बिराजदार यांच्या योगदानातून तांबरवाडी-राजेवाडी गावांच्या विकासाला चालना मिळत असून, ग्रामपंचायतीच्या या विकासात्मक वाटचालीची परिसरात चर्चा होत आहे.

माझा एकच मुख्य हेतू आहे तांबरवाडी राजेवाडी गावच्या विकासाला चालना देत सर्वसामान्यांच्या शब्दाला जागत. तांबरवाडी राजेवाडी गावची जनता दैवत मानून सेवा करत विकासात्मक कामासह तांबरवाडी गावला विकासाचे मॉडेल करण्याचा माझा संकल्प असल्याचं पंचायत समिती सदस्य तथा उपसरपंच राम बिराजदार यांनी सांगितले...

लढवय्ये पँथर तानाजी कदम यांचे दुःखद निधन : नामदार रामदास आठवले साहेब यांनी दिली कदम कुटुंबियांना सांत्वन पर भेट

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

वागदरी/एस.के.गायकवाड : भारतीय दलित पँथर पासून ते आजतागायत रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय सामाजिक न्याय व अधिकारता मंत्री भारत सरकार नामदार रामदासजी आठवले साहेब यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून प्रामाणिकपणे आणि निष्ठेने काम करणारे तुळजापूर, जिल्हा धाराशिव येथिल निष्ठावंत कार्यकर्ते तथा रिपाइं चे मराठवाडा विभाग उपाध्यक्ष तानाजी देवाप्पा कदम यांचे अल्पशा आजाराने दि.२१ नोव्हेंबर २२६ रोजी दुःखद निधन झाले.

दि.२२नोव्हेंबर २०२६ रोजी त्यांच्या पार्थिव देहावर तुळजापूर येथिल मोतीझरा स्मशान भूमित बौध्द धम्म संस्कारानुसार आंतिम संस्कार करण्यात आले. या प्रसंगी रिपाइं (आठवले) चे महाराष्ट्र प्रदेश जाईंट सेक्रेटरी राजा भाऊ ओव्हाळ सह शोकाकुल सर्व पक्षीय कार्यकर्ते पदाधिकारी यानी, तानाजी कदम यांच्या दुःखद निधनाने आंबेडकरी चळवळीतील एक लढवय्ये पँथर काळाच्या पडद्याआड झला असून रिपब्लिकन चळवळीत कधिही न भरून निघणारी पोकळी निर्माण झाली आहे.अशा भावपूर्ण शब्दात त्यांना श्रद्धांजली वाहिली.



तर दि.२३ नोव्हेंबर २०२६ रोजी तानाजी कदम यांच्या दुःखद निधनाबद्दल रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय सामाजिक न्याय व अधिकारता राज्य मंत्री भारत सरकार नामदार रामदासजी आठवले साहेब यांनी कदम कुटुंबीयांना भेट देऊन त्यांचे सांत्वन केले.या प्रसंगी रिपाइंचे महाराष्ट्र प्रदेश जॉइंट सेक्रेटरी राजाभाऊ ओव्हाळ, जिल्हाध्यक्ष विद्यानंद बनसोडे सह रिपाइंचे सन्माननीय पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. त्यांच्या पश्चात पत्नी , चार मूली जावाई नातवंडे, असा परिवार आहे.

वयाच्या ८८ व्या वर्षी मधुकर कोष्टी यांचे निधन

पहाटेपासून दुपारपर्यंत सायकलवरून घराघरांत पोहोचवला ज्ञानाचा जागर

७६ वर्षांची वृत्तपत्रसेवेची अखंड परंपरा थांबली; कोष्टी बाबांची सायकल कायमची थांबली

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

निफाड/प्रतिनिधी : ऊन, वारा, पाऊस असो वा आयुष्यातील सुख-दुःखाचे प्रसंग... कशाचीही तमा न बाळगता तब्बल ७६ वर्षे सायकलवरून घराघरांत वर्तमानपत्र पोहोचविणारे निफाडचे परिचित व्यक्तिमत्त्व मधुकर कोष्टी (८८) यांची अखेरची फेरी सोमवारी रात्री थांबली. अल्पशा आजाराने त्यांचे निधन झाले आणि निफाडकरांच्या मनात पहाटेच्या धुक्यात सायकलवरून वर्तमानपत्र वाटप करणाऱ्या 'कोष्टी बाबां'च्या आठवणी दाटून आल्या.

मधुकर कोष्टी यांच्या वृत्तपत्र वितरण सेवेचा प्रारंभ १९५२ मध्ये झाला. वडील कै. काशिनाथ कोष्टी यांनी १९५० च्या दरम्यान सुरू केलेला हा व्यवसाय त्यांनी आयुष्यभर जपला. विशेष म्हणजे, सात दशकांहून अधिक काळ त्यांनी एकाच सायकलवरून वृत्तपत्रांचे वितरण केले. नाशिकरोड येथील करन्सी नोट प्रेसमध्ये नोकरी करतानाही त्यांनी ट्रेन मध्ये वृत्तपत्र वितरणाची जबाबदारी निष्ठेने सांभाळली. या प्रवासात पत्नी लताताई यांची त्यांना मोलाची साथ लाभली.

पहाटे तीन वाजता उठून बसस्थानकावर आलेले वृत्तपत्रांचे पार्सल फोडायचे आणि साडेचारपासून वितरणाला सुरुवात करायची, असा त्यांचा दिनक्रम होता. निफाडसह कुंदेवाडी, रवळस तसेच रेल्वेने प्रवास करणाऱ्या प्रवाशांपर्यंतही ते वर्तमानपत्र पोहोचवत. तब्बल ३५० वृत्तपत्रांचे वितरण पूर्ण करताना सकाळचे ११ ते १२ वाजत.



या प्रवासात कुत्र्यांचे हल्ले, वाहनांच्या धडका आणि दुखापतींचे प्रसंग आले; मात्र कर्तव्यापासून ते कधीही मागे हटले नाहीत. वर्तमानपत्र हे केवळ व्यवसायाचे साधन नव्हे, तर आपले जीवनकर्तव्य आहे, अशा निष्ठेने त्यांनी सेवा बजावली.

आज त्यांच्या निधनाने निफाडच्या वृत्तपत्र वितरण क्षेत्रातील एक समर्पित पर्व संपले आहे. त्यांच्या पश्चात पत्नी लताताई, तीन विवाहित मुली, सून, नातवंडे असा परिवार आहे. आता पहाटेच्या रस्त्यांवर कोष्टी बाबांची सायकल दिसणार नाही; मात्र त्यांच्या ७६ वर्षांच्या सेवाभावी प्रवासाच्या आठवणी निफाडकरांच्या मनात कायम राहतील.

चिखली तहसीलदारांची धडक कारवाई

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

कैलास आंधळे/चिखली तालुका प्रतिनिधी : चिखली तालुक्यातील मेरा बुद्रुक मार्गे होणाऱ्या अवैध गौण खनिज आणि रेती वाहतुकीविरुद्ध चिखली महसूल प्रशासनाने कंबर कसली असून,तहसीलदार विजय सवडे यांनी दिनांक २५ नोव्हेंबर २०२६ रोजी धडक कारवाई करत विनापरवाना रेतीची वाहतूक करणारा एक टिप्पर रंगेहात पकडून जप्त केला आहे. या कारवाईमुळे रेती माफियांचे चांगलेच धाबे दणाणले आहेत.



मेरा बुद्रुक मार्गे अवैध रेती वाहतूक करणारा टिप्पर जप्त

मिळालेल्या माहितीनुसार,मेरा बुद्रुक मार्गे मोठ्या प्रमाणावर अवैध रेती वाहतूक सुरू असल्याची गोपनीय माहिती तहसीलदार विजय सवडे यांना मिळाली होती. या माहितीची गंभीर दखल घेत तहसीलदारांनी आपल्या चालकाकडे रेती वाहतुकीच्या परवान्याची (रॉयल्टी) विचारणा केली असता, त्याच्याकडे कोणतीही वैध कागदपत्रे आढळून आली नाहीत. ही रेती पूर्णपणे अवैध असल्याचे निष्पन्न होताच तहसीलदार विजय सवडे यांनी तात्काळ कारवाई करत संबंधित टिप्पर ताब्यात घेतला. जप्त केलेला टिप्पर पुढील दंडात्मक कारवाईसाठी अंढेरा स्टेशनच्या आवारात जमा करण्यात आला आहे.

पथकासह या मार्गावर सापळा रचला. यावेळी संशयास्पदरीत्या वेगाने येणारा रेतीचा टिप्पर महसूल पथकाने अडवला.

महसूल प्रशासनाचा कडक इशारा

तालुक्यात कोणत्याही प्रकारची अवैध रेती वाहतूक किंवा गौण खनिजाचे उत्खनन खपवून घेतले जाणार नाही. यापुढेही अशाच प्रकारच्या धडक कारवाया सातत्याने सुरू राहतील, असा सज्जड इशारा तहसीलदार विजय सवडे यांनी यावेळी दिला आहे. या कारवाईत महसूल विभागाचे मंडळ अधिकारी, तलाठी आणि इतर कर्मचाऱ्यांनी मोलाची भूमिका बजावली.